पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे
Pune metropolitan Region Development Authority, Pune
नवीन प्रशासकीय इमारत, आकुर्डी रेल्वे स्टेशन जवळ, आकुर्डी, पुणे- ४११०४४
PUNEMETROPOLIS
New Administrative Building, Near Akurdi Railway Station, Akurdi, Pune-411044
Ph No. : 020- 259 33 344 / 356 / 333 / फोन. नं. ०२०- २५९ ३३ ३४४/ ३५६ / ३३३ Email: comm@pmrda.gov.in

# सुधारित विकास परवानगी व प्रारंभ प्रमाणपत्र

**(मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील नियम क्र. ६.६.१ नुसार)**

जा.क्र.:बीएचए/मौ.मांजरी खु.व वाघोली/ग.नं.१२४ इतर/ सेक्टर आर-१४/प्र.क्र.२२१६/२३-२४/८७६३ दि.०७/०२/२०२४

प्रति,

मे. ॲशडॅन डेव्हलपर्स प्रा. लि. व मांजरी हाऊसिंग प्रोजेक्टस
एलएलपी तर्फे श्रीमती.मीना कर्णे,
पत्ता- सॉलीटीयर वर्ल्ड, ८ मजला, स.नं. ३६/१/१,
रेजेनसी क्लासीक, मुंबई बंगलोर महामार्ग, बाणेर, पुणे -४५

मौजे- मांजरी खु., येथील ग.नं. १२४ इतर व मौजे- वाघोली येथील ग.नं.१२५५/१४ व इतर तालुका- हवेली, जिल्हा- पुणे क्षेत्र ६६६५७५.०० चौ.मी. (६६ हे. ६५.७५ आर.) या क्षेत्रावरील मंजूर एकात्मीकृत नगर वसाहतीच्या सहाव्या सुधारित बृहत आराखड्यातील सेक्टर आर-१४, एकूण क्षेत्र- २२८८०.०० चौ.मी. प्रस्तावित नकाशानुसार२१९०५.०० चौ.मी. मधील रहिवास इमारत बांधकाम परवानगी प्रस्ताव मंजूरीस्तव प्राधिकरणाकडे प्राप्त झाला आहे.

आपण प्रस्तावासोबत सादर केलेल्या कागदपत्रास अधिन राहून तसेच सोबतच्या परिशिष्ट 'अ' मध्ये नमूद अटी व शर्तीस अधिन राहून उक्त प्रस्तावास विकास परवानगी व प्रारंभ प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

(मा. महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने)

Sd/-
महानगर आयुक्त,
तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
पुणेयांचे करिता

Pune Metropolitan Regional Development Authority, Pune ★ PMRDA

Scanned with CamScanner

मौजे- मांजरी खु., येथील ग.नं. १२४ इतर व मौजे- वाघोली येथील ग.नं.१२५५/१४ व इतर तालुका- हवेली, जिल्हा- पुणे क्षेत्र ६६६५७५.०० चौ.मी. (६६ हे. ६५.७५ आर.) या क्षेत्रावरील मंजूर एकात्मीकृत नगर वसाहतीच्या सहाव्या सुधारित बृहत आराखड्यातील सेक्टर आर-१४, एकूण क्षेत्र- २२८८०.०० चौ.मी. प्रस्तावित नकाशानुसार२१९०५.०० चौ.मी. मधील रहिवास इमारत बांधकाम परवानगी प्रस्ताव.

---

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांचेकडील दि. ०७/०२/२०२४ रोजीचे पत्र क्र.२२१६/२३-२४ सोबतचे

परिशिष्ट 'अ'

१) मंजूर नकाशाप्रमाणेच जागेचा विकास व बांधकाम करणे बंधनकारक राहील.

२) सदर विकास परवानगी व प्रारंभ प्रमाणपत्र दिल्यानंतर एक वर्षाच्या कालावधीपर्यंत बांधकाम सुरु करणे बंधनकारक राहील. बांधकाम सुरु केल्याबाबत प्राधिकरणाला त्याप्रमाणे कळविणेत यावे. तदनंतर त्यापुढे आवश्यकतेनुसार विहीत मुदतीमध्ये सदर परवानगी व प्रमाणपत्राचे नुतनीकरण करुन न घेतल्यास सदरचे परवानगी व प्रमाणपत्र संपुष्टात येईल.

३) सदर एकात्मिकृत वसाहतीमधील मौ. मांजरी खु. येथील क्षेत्राकरिता मा. जिल्हाधिकारी कार्यालय पुणे यांचेकडील पत्र क्र.पमह/कावि/१२८७/२००८, दि. ०७/०६/२००८ अन्वये प्राप्त उद्देशपत्र (Letter of Intent) तसेच मौ. वाघोली येथील क्षेत्राकरिता मा. जिल्हाधिकारी कार्यालय पुणे यांचेकडील पत्र क्र. पमह/कावि/१२३६/२०२०, दि. ०३/०३/२०२१ अन्वये प्राप्त उद्देशपत्र (Letter of Intent) मधील नमूद सर्व व शर्ती पूर्तता करणे कंपनीवर बंधनकारक राहील. तसेच मौजे मांजरी खु. व मौजे वाघोली करिता मा. जिल्हाधिकारी कार्यालय पुणे यांचेकडील पत्र क्र. पमह/कावि/३०४/२०२३, दि. १२/०४/२०२३ अन्वये प्राप्त उद्देशपत्र (Letter of Intent) मधील नमूद सर्व व शर्ती पूर्तता करणे कंपनीवर बंधनकारक राहील.

४) एकात्मीकृत नगर वसाहत विकसीत करणेकामी शासन अधिसुचना दि.०८/०३/२०१९ चे विनीमय व त्यामध्ये सुधारित करण्यात येणाऱ्या सर्व नियमांचे तसेच शासनाकडून / जिल्हाधिकारी कार्यालयाकडून येणाऱ्या सर्व सुचनांचे पालन करणे अर्जदार कंपनीवर बंधनकारक राहील.

५) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुणे यांचेकडील जा.क्र. बीएचए / मौ. मांजरी खु. व वाघोली /प्र.क्र. १९६५/१९८८/२२-२३, दि. १८/०४/२०२३ अन्वये सुधारित सहावा बृहत आराखडा मंजूर असुन यातील अटी / शर्ती अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

६) शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसुचना अधिसुचना टीपीएस- १८०७/२४५/प्र.क्र. ६४१/०७/नवि - १३, दि. ०४/०४/२००८ व शुध्दीपत्रक दिनांक ०४/१२/२००८ तसेच मा. संचालक, नगर रचना व मुल्य निर्धारण विभाग यांचेकडील अधिसुचना क्र. टिपीएस / मौ. मांजरी खु. वाघोली / ए.न.व.प्र/ टिपीव्ही -१ / २८९६ दि. २७/१०/२०२० तसेच शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसुचना टीपीएस- १८२१/१५६१/प्र.क्र.१३८/२०२२/नवि -१३, दि.२०/०२/२०२३ अन्वये Locational Clearance मधील अटींचे / सुचनांचे पालण करणे अर्जदार कंपनीवर बंधनकारक राहील.

Pune Metropolitan Regional Development Authority, Pune ★ PMRDA



Scanned with CamScanner

मौजे- मांजरी खु., येथील ग.नं. १२४ इतर व मौजे- वाघोली येथील ग.नं.१२५५/१४ व इतर तालुका- हवेली, जिल्हा- पुणे क्षेत्र ६६६५७५.०० चौ.मी. (६६ हे. ६५.७५ आर.) या क्षेत्रावरील मंजूर एकात्मीकृत नगर वसाहतीच्या सहाव्या सुधारित बृहत आराखड्यातील सेक्टर आर-१४, एकूण क्षेत्र- २२८८०.०० चौ.मी. प्रस्तावित नकाशानुसार२१९०५.०० चौ.मी. मधील रहिवास इमारत बांधकाम परवानगी प्रस्ताव.

---

७) विशेष प्रसंगी महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांनी लेखी आदेश दिले तर ते कंपनीवर बंधनकारक राहतील. त्यास सदर परवानगी वरून बाधा येणार नाही.

८) नगर वसाहतीच्या नियमावलीतील अनुज्ञेय असलेल्या एकूण चटई क्षेत्र निर्देशांकाच्या मर्यादेत संपूर्ण टाऊनशिप चे बांधकाम करणे अर्जदार कंपनीवर बंधनकारक राहील.

९) प्रकल्पाबाबत कोणतीही जाहीरात करतेवेळी जाहिरातीमध्ये मंजूर विकास परवानगी प्रमाणे तपशील व नकाशे इत्यादीचा समावेश करणे अर्जदार कंपनीवर बंधनकारक राहील.

१०) मौ. मांजरी व मौ. वाघोली एकात्मिकृत नगर वसाहतीचे बृहत आरखडे वेळोवेळी मंजूर करण्यात आलेले अहेत. तथापी, बृहत आराखड्यानुसार अधिकृत उप अधिक्षक भूमि अभिलेख विभागाकडून जागेची मोजणी झालेली नाही. तरी त्वरीत मोजणी खात्याकडे शेवटच्या मंजूर बृहत आरखड्यानुसार मोजणी कामी मोजणी फी भरुन त्वरीत मोजणी करण्यात यावी व मोजणी नकाशा या कार्यालयाकडे सादर करावा.

११) प्रस्तुतच्या जमिनीवर आर्थिक संस्थाचा बोजा असल्यास त्यास अर्जदार / जमीनमालक /विकासक सर्वस्वी जबाबदार राहतील.

१२) नागरी जमीन (कमाल धारणा व विनियम) अधिनियम,१९७६ हा निरसित झाला असल्याने या अधिनियमांतर्गत बाबींकरिता प्रस्तावासोबत आपण रु. ५००/- च्या स्टॅम्प पेपरवरील दिनांक- ०९/०६/२०२१ रोजी नोटरी श्री. सतिशचंद्र पितळे यांचेसमोर केलेले विहीत नमुन्यातील शपथपत्र व बंधपत्र क्र. ६८/८/२०२१ सादर केलेले आहे. सदर शपथपत्र व बंधपत्रास अधिन राहून सदर बांधकाम परवानगी देण्यात येत आहे. त्याबाबतची संपूर्ण जबाबदारी अर्जदार /जमीनमालक /विकासक यांची राहील सदर शपथपत्र व बंधपत्रातील माहिती चुकीची अथवा दिशाभूल करणारी आढळून आल्यास झालेले बांधकाम अनधिकृत समजून कारवाईस पात्र राहील.

१३) विषयांकित जमिनीवर कोणतेही विकास कार्य सुरु करण्यापूर्वी रेखांकन जागेवर सिमांकित करुन भूमि अभिलेख खात्याकडून प्रमाणित करुन घेणे बंधनकारक आहे. मंजूर रेखांकनानुसार जागेवरील सिमांकन झाल्यानंतर, भूखंडाचे क्षेत्रफळ, रस्त्याची रुंदी मंजूर रेखांकनात दर्शविल्यापेक्षा कमी भरता कामा नये. यामध्ये कोणताही बदल झाल्यास रेखांकन पुन्हा मंजूर करुन घेणे बंधनकारक राहील. अशा प्रमाणित रेखांकनाची प्रत प्राधिकरणास सादर करुन त्यास अंतिम मंजूरी घेतल्याशिवाय कोणताही विकास करता येणार नाही.

१४) मंजूर नकाशात दर्शविलेप्रमाणे नियोजित बांधकामापासुन पुढील, मागील व बाजुची सामासिक अंतरे प्रत्यक्षात जागेवर कायम व खुली ठेवणे आवश्यक राहील.

Pune Metropolitan Regional Development Authority PMRDA Pune



Scanned with CamScanner

मौजे- मांजरी खु., येथील ग.नं. १२४ इतर व मौजे- वाघोली येथील ग.नं.१२५५/१४ व इतर तालुका- हवेली, जिल्हा- पुणे क्षेत्र ६६६५७५.०० चौ.मी. (६६ हे. ६५.७५ आर.) या क्षेत्रावरील मंजूर एकात्मीकृत नगर वसाहतीच्या सहाव्या सुधारित बृहत आराखड्यातील सेक्टर आर-१४, एकूण क्षेत्र- २२८८०.०० चौ.मी. प्रस्तावित नकाशानुसार२१९०५.०० चौ.मी. मधील रहिवास इमारत बांधकाम परवानगी प्रस्ताव.

---

१५) रेखांकनातील भूखंड व नियोजित इमारतीचा वापर फक्त मंजूर नकाशानुसार ""रहिवास व वाणिज्य"" याप्रमाणे अनुज्ञेय केलेल्या वापरासाठी करणे बंधनकारक राहील. इमारतीच्या वापरात बदल करावयाचा असल्यास त्यास प्राधिकरणाची पूर्वमंजूरी घ्यावी लागेल.

१६) इमारतीचे जोता तपासणीसाठी अर्ज करताना अकृषिक परवानगी आणि परवानाधारक, वास्तुविशारद/ अभियंता /स्ट्रक्चरल अभियंता/ सुपरवायझर यांचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील, त्याचप्रमाणे अंतिम भोगवटा प्रमाणपत्रासाठी अर्ज करताना बांधकाम प्रस्तावांतर्गत जमिनीचे महसूल /भूमी अभिलेखात एकत्रिकरण /उपविभागणी केलेला अद्यावत ७/१२ उतारा /प्रॉपर्टी कार्ड व मोजणी नकाशा सादर करणे बंधनकारक राहील.

१७) इमारतीचे मंजूर नकाशानुसार जोत्यापर्यंतचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर जोते तपासणी प्रमाणपत्र प्राप्त करुन न घेता पुढील बांधकाम केल्यास सदरचे बांधकाम अनधिकृत समजण्यात येऊन असे बांधकाम दंडात्मक कार्यवाहीस पात्र राहील.

१८) अभिन्यासातील रस्ते, व खुली जागा यांची देखभाल व अभिन्यासामध्ये दर्शविलेले बृहत आराखडा / वर्गीकृत /प्रादेशिक योजना रस्ते/ रस्ता रुंदीकरणातील क्षेत्र सर्व जनतेच्या वापरासाठी तसेच शेजारच्या जमीनमालकास वापरण्यास खुले ठेवणे बंधनकारक राहील.बृहत आराखड्यातील सर्व अटी / शर्ती यांचे पालन करणे अर्जदार / विकासक / जमिनमालक यांचेवर बंधनकारक राहील.

१९) बृहत आराखड्यातील सर्व रस्ते व सोयी सुविधा यांचा विहीत मुदतीत विकास करून घेणे अर्जदार / विकासक / जमिनमालक यांचेवर बंधनकारक राहील.

२०) रेखांकनातील रस्ते, गटारे, खुली जागा इत्यादी अर्जदारांने/ विकासकांने /जमीनमालकाने भुखंड/ सदनिका वितरित करण्यापूर्वी जागेवर स्वखर्चाने व समाधानकारकरित्या विकसित करणे आवश्यक आहे.

२१) नियोजित बांधकामातील मजल्यांची संख्या व उंची,मंजूर रेखांकन/बांधकाम नकाशांवर दर्शविल्यापेक्षा जास्त असता कामा नये.

२२) नियोजित बांधकामाचे क्षेत्र, प्रादेशिक योजना रस्ते/रस्ता रुंदी क्षेत्र नकाशावर दर्शविलेनुसार प्रत्यक्ष जागेवर असणे आवश्यक आहे.

२३) नकाशे मंजूरीनुसार इमारतीमध्ये भुकंप प्रतिरोधकाचे (Earthquake) दृष्टीने व Natural Calamities च्या दृष्टीने उपाययोजना करणे व इमारतीचे स्ट्रक्चरल डिझाईन कंपनीच्या संबंधित सल्लागार यांचेकडून करून घेणे व त्यानंतर प्रत्यक्ष बांधकामास सूरूवात करणे व त्यांच्या सल्याने व देखरीखाली करणे अर्जदार कंपनीवर बंधनकारक राहील.

२४) जागेतील/ जागेलगतच्या नाल्याच्या/ नदीच्या नैसर्गिक प्रवाहास अडथळा येईल, असे कोणतेही बांधकाम करता येणार नाही. त्याचप्रमाणे उक्त जमिनीवरील विकास करताना जागेवरील भूपृष्ठ रचनेमध्ये अनधिकृत बदल करता

PMRDA
Pune Metropolitan Region Development Authority, Pune



Scanned with CamScanner

---

येणार नाहीत. सदर अटीचा भंग करुन विकास केल्याने दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी अर्जदार / विकासक/ जमिनमालक यांची राहील.

२५) स्ट्रक्चरल इंजिनिअर / डिझायनर यांनी तयार केलेल्या Structural Design नुसार प्रत्यक्ष जागेवर बांधकाम व संरक्षण भिंतीचा विकास करणे आणि त्याबाबत शेजारील जमिनधारक यांना धोका पोहचणार नाही, याची जबाबदारी अर्जदार / विकासक व सुपरवायझर यांची संयुक्तिक राहील. तसेच मंजूर एकत्रित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील नियम क्र. ६.१२ पाहता प्रस्तावित इमारतीची उंची ७०.०० मी. पेक्षा जास्त असल्याने GEOTECHNICAL INVESTIGATION REPORT यांचेकडील अहवाल सादर करणे आवश्यक राहील.याची पूर्तता झालेनंतरच बांधकाम सुरु करणे बंधकनकारक राहील.

२६) अर्जदार / विकासक/ जमिनमालक यांनी दि.०५/१०/२०२३, क्र.१२३४/२९/२०२३ अन्वये दिलेल्या शपथपत्रास अधिन राहुन ही परवानगी देण्यात येते असुन प्रमाणित विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावलीमधील सर्व नियम आणि भारतीय मानक ब्युरोने विहित केलेल्या सुरक्षा प्रमाणकांचे पालन करणे अर्जदार / विकासक/ जमिनमालक यांचेवर बंधनकारक राहील.( नियम क्र. ७.१ )

२७) शासन नगर विकास विभागाकडील दि. १९/११/२००८ चे निदेश क्र. टिपीव्ही-४३०८/४१०२/ प्र.क्र.३५९/०८/नवि-११ नुसार अर्जदार / विकासक/ जमिनमालक व वास्तुविशारद यांनी बांधकाम नकाशामध्ये प्रत्येक सदनिकेचे एकूण चटईक्षेत्र (Carpet area) नमूद केलेले आहे. सदर नमूद चटई क्षेत्रा (Carpet area) बाबत आकडेमाडे, गणितीय चुका इ. बाबत वास्तुविशारद व अर्जदार / विकासक/ जमिनमालक संयुक्तिकरित्या जवाबदार राहतील.

२८) एकात्मीकृत नगर वसाहत प्रकल्पासाठी दिनांक ०८/०३/२०१९ रोजीचे मान्य अधिसूचनेमधील तरतूद क्र. १२.६ नुसार विकासक यांनी सदर प्रकल्पाच फेज नुसार विकास खर्चाच्या १५% बँक गँरटी जमा करणे आवश्यक आहे. सदर प्रकल्पाचे Phase Wise Programm वास्तुविशारद यांनी दिलेले असून त्यानुसार सदर सेक्टर आर-१२ हा फेज-३ मध्ये प्रस्तावित आहे. फेज-३ मूळ पायाभूत सुविधा विकसनाचा खर्च रक्कम रु. २४.३९ कोटी आहे. सदर रक्कमेच्या १५% रक्कमेची रु. ३,६५,८५,०००/- ची Bank Garantee अर्जदार कंपनीने आय सी आय सी आय बँक, पुणे शाखा यांचे क्र.0321NDDG00009424, दि१२/०४/२०२३ रोजीचे पत्रान्वये सादर केलेली आहे.

२९) ओला व सुक्या कचऱ्याकरिता सदर जागेत स्वतंत्र कंटेनरची सोय करणे आवश्यक राहील. विघटन होण्याऱ्या ओल्या कचऱ्यासाठी गांडुळखत प्रकल्प अर्जदार / विकासक/ जमिनमालक यांनी स्वखर्चाने करावयाचा आहे.

३०) शासन निदेशानुसार बांधकाम करताना प्लाय अँशचा वापर करणे बंधनकारक राहील.

Pune Metropolitan Regional Development Authority, Pune PMRDA



Scanned with CamScanner

मौजे- मांजरी खु., येथील ग.नं. १२४ इतर व मौजे- वाघोली येथील ग.नं.१२५५/१४ व इतर तालुका- हवेली, जिल्हा- पुणे क्षेत्र ६६६५७५.०० चौ.मी. (६६ हे. ६५.७५ आर.) या क्षेत्रावरील मंजूर एकात्मीकृत नगर वसाहतीच्या सहाव्या सुधारित बृहत आराखड्यातील सेक्टर आर-१४, एकूण क्षेत्र- २२८८०.०० चौ.मी. प्रस्तावित नकाशानुसार२१९०५.०० चौ.मी. मधील रहिवास इमारत बांधकाम परवानगी प्रस्ताव.

---

३१) सौर उर्जेवर पाणी तापवण्यासाठीची यंत्रणा अर्जदार/ विकासक/ जमिनमालक यांनी इमारतीचे वापरापुर्वी स्वखर्चाने करावयाची आहे.

३२) वेस्ट वॉटर ट्रिटमेंट प्लँट / Sewerge Treatment Plant उभारणे अर्जदार/ विकासक/ जमिनमालक यांचेवर बंधकनकारक असुन पाण्याचा फेरवापर बगीचा, झाडाची जोपासणा यासाठी करणे आवश्यक आहे.

३३) प्रस्तुत प्रकरणी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांच्या मुख्य अग्निशमन अधिकारी यांचेकडून अग्निशमन यंत्रणा व सुविधांची पूर्तताबाबतचे नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त नाही. याबाबत विकसक यांनी रु.५०० च्या मुद्रांकावर प्रतिज्ञापत्र दिले आहे. त्यानुसार बांधकाम सुरु करण्यापुर्वी अग्निशमन विभागाकडून Provisional Fire NOC प्राप्त झाल्याशिवाय प्रत्यक्ष जागेवर बांधकाम सुरु करता येणार नाही.

३४) सदर प्रकरणी अर्जदार यांनी Ministry of Defence यांचेकडील जा.क्र. SWAC /२५६४/६/२२८५/ATS (BM) दि. २६/११/२०२० रोजीचे ना-हरकत दाखला एकूण उंची १२९.३० मी. व AMSL ६९१.४० मी. साठी ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करून घेतलेले आहे. यातील अटी / शर्ती अर्जदार यांचेवर बंधनकारक राहतील.

३५) प्रारंभ प्रमाणपत्र दिलेल्या कोणत्याही इमारतीचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर मंजुर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील नियम क्र. ७.५ नुसार पुर्णत्वाचे अर्जदार/ विकासक/ जमिनमालक यांनी सादर करुन नियम क्र. ७.६ नुसार भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करुन घेतल्याखेरीज कोणत्याही इमारतीचा भागश: / पुर्णत: वापर सुरु केल्यास अर्जदार/ विकासक/ जमिनमालक कारवाईस पात्र राहील.

३६) सदर जमिनीचे क्षेत्रफळ ५०० चौ.मी. जास्त आहे. त्यामुळे प्रत्येक प्रत्येक ८० चौ.मी. क्षेत्रासाठी एक झाड याप्रमाणे वृक्ष लागवड करणे व त्याची जोपासणा करणे अर्जदार/ विकासक /जमिनमालक यांचेवर बंधनकारक राहील.

३७) सदर इमारतीचे बांधकाम सूरू करताना बृहत आरखड्यातील सर्व रस्त्याची कामे विकास कार्य सूरू करणे बंधनकारक राहील.

३८) सदरचा भुखंडास मंजूर बृहत आराखड्यानुसार प्रा.यो. व विकास योजनेतील प्रस्तावित ३० मी. व अस्तित्वातील १२ मी. रुंदीचां रस्ता उपलब्ध होत आहे. मांजरी खुर्द ग.नं.१३६ मधील १.७३ हे. राखीव वन जमीन ३० मी. प्रादेशिक योजना रस्त्याने बाधित होत आहे. सदर वन जमीन वनसंवर्धन अधिनियम १९८० चे कलम २ अंतर्गत दि.३१/०३/२०२१ रोजीच्या आदेशाने मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक) पुणे यांनी अटी/शर्तीस अधिन राहून रस्ता करण्याकरिता परवानगी दिली आहे. सदर अटी/शर्ती अर्जदार कंपनीवर बंधनकारक राहतील.

PMRDA Pune Metropolitan Region Development Authority

३९) सदर प्रकरणी एकात्मीकृत नगर वसाहत प्रकल्पाकरिता पर्यावरण विभागाकडील दि.०९/०१/२०२३ अन्वये FSI- ११३०३२३.०० चौ.मी, NON FSI – ८६६९५६.०० चौ.मी असे एकुण FSI + NON FSI – १९९७२७९.००



Scanned with CamScanner

मौजे- मांजरी खु., येथील ग.नं. १२४ इतर व मौजे- वाघोली येथील ग.नं.१२५५/१४ व इतर तालुका- हवेली, जिल्हा- पुणे क्षेत्र ६६६५७५.०० चौ.मी. (६६ हे. ६५.७५ आर.) या क्षेत्रावरील मंजूर एकात्मीकृत नगर वसाहतीच्या सहाव्या सुधारित बृहत आराखड्यातील सेक्टर आर-१४, एकूण क्षेत्र- २२८८०.०० चौ.मी. प्रस्तावित नकाशानुसार२१९०५.०० चौ.मी. मधील रहिवास इमारत बांधकाम परवानगी प्रस्ताव.

---

चौ.मी क्षेत्राकरिता Environment Clearance प्राप्त असून सदर प्रमाणपत्रातील अटी व शर्ती अर्जदार/विकासक यांचेवर बंधनकारक राहतील.

४०) शासनाचे पत्र क्र.टिपीएस-१८२३/१७६/प्र.क्र.३६/२०२३/नवि-१३, दि.२९/०३/२०२३ अन्वये पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामधील एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पाकरिता UDCPR नियमावली लागू केला आहे. त्यानुसार UDCPR नुसार बांधकाम परवानगी देण्यात आली आहे. मौजे वाघोली हे गाव महानगरपालिका हद्दीमध्ये समाविष्ट असून UDCPR नियम क्र.६.१.१ नुसार Ancillary FSI करिता १५% अधिमूल्याची आकारणी केलेली आहे.

४१) सदर प्रकरणी सेक्टर आर-१४ मध्ये प्राधिकरणाकडील वृक्ष प्राधिकरण विभागाकडील Provisional Tree NOC, जा.क्र.७०९७, दि.२१/१२/२०२३ अन्वये प्राप्त आहे. सबब, महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ व नियम २००९ चे काटेकोर पालन करणे विकसकावर बंधनकारक राहील.

४२) यापुर्वी दिलेल्या विकास परवानगी प्रमाणपत्रातील आणि बृहत आराखड्यातील सर्व अटी व शर्ती अर्जदार यांचेवर बंधनकारक राहतील.

४३) मोठ्या इमारत बांधकामाच्या ठिकाणी काम करणाऱ्या मंजूरीमधील गरोदर माता, स्तनदा माता आणि त्यांच्यासोबत असणाऱ्या ० ते ६ वर्षे वयोगटातील मुलांकरिता शेड बांधणे, शौचालय व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, पाळणाघर इ. तात्पुरत्या सुविधा कंत्राटदार किंवा बांधकाम विकासक यांनी करणे आवश्यक आहे.

४४) प्रस्तुत जमिनीवर भविष्यात छाननी शूल्क, प्रिमीयम शूल्क, विकास शूल्क, सुरक्षा ठेव व कामगार कल्याण उपकर इत्यादी बाबतच्या रक्कमेची बाकी उद्भवल्यास सदर रक्कम प्राधिकरणाकडे जमा करणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

४५) अर्जदार यांनी सादर केलेली कोणतीही माहिती अथवा कागदपत्रे ही चुकीची/दिशाभूल करणारी आढळल्यास प्रस्तुतची विकास परवानगी व प्रारंभ प्रमाणपत्र रद्द समजणेत येईल.

(मा. महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने)

महानगर आयुक्त
तथा,
मुख्य कार्यकारी अधिकारी
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
पुणे यांचे करिता.

Pune Metropolitan Regional Development Authority, Pune
PMRDA